महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०१९-२०/२०२०/ १५७५ दिनांक : २१.०५.२०२०.

**महत्वाचे परिपत्रकः**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित,
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी सर्व अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

विषय : महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदत.
संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७ दिनांक २०.०५.२०२०.

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अंतर्गत खुल्या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांसाठी खालील शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत.

**१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना,**
**२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना,**
**३. राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या महाडीबीटी पोर्टलवर उपरोक्त योजनांचे विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले ऑनलाईन अर्ज मुदतीमध्ये संस्थांनी तपासणी न केल्याने अद्यापही संस्थांच्या लॉगीनमध्ये प्रलंबीत आहेत. सदरचे प्रलंबीत अर्जांमधील त्रूटींची पूर्तता करुन सदर अर्ज संस्थांनी व्यवस्थित तपासणी करुन दिनांक २६.०५.२०२० पर्यंत निकाली काढण्यासाठी या परिपत्रकाद्वारे सर्व संस्थांच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येत आहे.

दिनांक २६.०५.२०२० नंतर संस्थांच्या लॉगीनमध्ये तपासणी साठी प्रलंबीत असलेल्या अर्जांसाठी संस्थांना मुदतवाढ मिळणार नाही व असे संस्थेकडे प्रलंबीत असलेले विद्यार्थ्यांचे अर्ज सिस्टीमद्वारे Automatic नामंजूर करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,
३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४८६
ई-मेल : desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ - ई-मेलद्वारे / स्पीड पोस्टद्वारे

क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७
दिनांक : २०/०५/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत ......

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५७० दि.२३/१२/२०१९
२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९ दि.२८/०२/२०२०

महोदय,

आपले सरकार डी.बी.टी.पोर्टल ( संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या महाडीबीटी पोर्टलवरील उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांच्या लॉगीनमध्ये योजनांसाठीचे विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले अर्ज तपासणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या मुदतवाढीच्या कालावधीमध्ये प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते तसेच " **विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी.**" असेही कळविण्यात आलेले होते. तरीदेखील काही विद्यार्थ्यांचे अर्ज मुदतीमध्ये तपासणी न केल्याने संस्थांस्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबतचा पोर्टलवरील विभागनिहाय अहवाल सोबत जोडला आहे. तरी शासनाने प्रलंबित अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्यासाठी सोबत जोडलेल्या महाडीबीटी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार संस्थांसाठी **दि.२६/०५/२०२० पूर्वी** व कार्यालयांसाठी **दि.३१ /०५/२०२० पूर्वी** निकाली काढण्याबाबत सूचित केले आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना या पत्राद्वारे सुचित करण्यात येतें की, आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व संस्थांना, संस्थांच्या लॉगीन आयडी अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज तसेच Sent Back ( Revert झालेले ) अंतर्गत असलेल्या अर्जांची त्रुटी दूर करुन अंतिम दिनांकापूर्वी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्याबाबत सूचित करावे. तसेच, सर्व विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीन आयडीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी **दि.२८/०५/२०२० पूर्वी** करुन निकाली काढावेत.

तसेच विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये Sent Back अंतर्गत व तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज अंतिम तारखेनंतर सिस्टिमद्वारे Automatic नामंजूर करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील आणि यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला,

( डॉ. अभय वाघ.)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

सोबत - वरीलप्रमाणे .

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.



Scanned with CamScanner